# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ / श्रावण १०, १९४५ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) विशेष सहाय्य मंत्री**<br>**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**<br>**(४) मृद व जलसंधारण मंत्री**<br>**(५) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री**<br>**(६) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### नाशिक महानगरपालिकेने नेमलेल्या घनकचरा व्यवस्थापन कंत्राटदाराला देयके अदा करुन केलेला गैरव्यवहार

**(१) * ७०२२२ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदाराने अटी शर्तीचे उल्लंघन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरीता घातलेल्या अटी शर्तीचे उल्लघंन केल्यामुळे देयकाची रक्कम अदा करता येणार नाही असा शेरा मारलेला असतांनाही त्याच कंपनीला कंत्राट देऊन अधिकाऱ्यांच्या संगनमताने ११ कोटी रुपयांचे देयक अदा करुन सदर गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

नाशिक मनपा क्षेत्रातील केरकचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या मक्तेदारांवर निविदा व करारनामाच्या अटी व शर्ती नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते. नाशिक मनपा क्षेत्रातील सहाही विभागांकरिता ठेकेदार नेमलेले असून देयक अदा करण्यात येऊ नये असा कोणताही शेरा देण्यात आलेला नाही. तथापि, पंचवटी व सातपूर विभागातील घंटागाडी मक्तेदार में.एजी.एनव्हायरो इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि. ठाणे या ठेकेदाराने उशिरा देयक सादर केल्याने सदर देयकाची पडताळणी करुन डिसेंबर, २०२२ ते फेब्रुवारी, २०२३ या कालावधीतील देयक लेखा व लेखापरिक्षण विभागाकडून तपासणी करुन व आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने रुपये ५.६९ कोटी त्यांनी केलेल्या कामकाजाप्रमाणे अदा करण्यात आलेले आहे.

(३) वृत्तपत्रातील प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने, नाशिक मनपा क्षेत्रातील केरकचरा संकलन, वाहतूक, वाहने व कामकाज तपासणी करीता आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी चौकशी समिती गठीत केलेली असून चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळांच्या बसेसमधून क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक होत असल्याबाबत**

**(२) * ६५८६४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रेल्वे आरक्षणाअभावी राज्य परिवहन महामंडळाच्या बसने व खाजगी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टप्पा प्रवासी वाहतूकीला सर्वत्र बंदी असूनही अनेक ठिकाणी अवैधरित्या व क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीमुळे अपघातांच्या प्रमाणात देखील वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, खाजगी वाहतूकदार प्रवाशांकडून जादा दराने भाडे आकारणी करत असल्यामुळे प्रवाशांना नाहक आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३), (४), (५) व (६) मोटार वाहन अधिनियमांतर्गत खाजगी प्रवासी बसेसना कंत्राटी परवाने जारी करण्यात येतात. परवान्याच्या अटी व शर्तीनुसार वाहतूकदारांना खाजगी बसेसमधून प्रवासी वाहतूक करणे आवश्यक आहे. शासनाने दिनांक २७.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील खाजगी कंत्राटी प्रवासी वाहनांचे कमाल भाडे दर निश्चित केले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रति किमी भाडे दराच्या ५०% पेक्षा अधिक भाडे खाजगी बस वाहतूकदारांना आकारता येत नाही. तसेच कमाल भाडेदरापेक्षा अधिक भाडे आकारणाऱ्या परवानाधारकां विरुध्द मोटार वाहन कायदा / नियमाप्रमाणे कडक कारवाई करुन वारंवार असे गुन्हे करणाऱ्या परवानाधारकांचा परवाना रद्द करण्याबाबत परिवहन आयुक्त यांना आदेशित करण्यात आले आहे.

-----------------

**वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी अरिहंत कन्स्ट्रक्शनने बनावट बँक हमी पत्र सादर केल्याबाबत**

**(३) * ६५१४० श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत वरणगाव शहर पाणी पुरवठा योजनेसाठी अरिहंत कन्स्ट्रक्शन, पुणे या कंत्राटदाराने बनावट बँक हमी पत्र (बँक गॅरंटी) नगरपरिषदेत दाखल करून काम मिळविल्याची तक्रार माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर कामाकरिता ठेकेदाराला ३ वेळा कामाचे पैसे देतांना देखील बँक गॅरंटी तपासून पाहिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर पालिका, वरणगाव, जि.जळगाव यांनी बनावट बँक हमी पत्रासंदर्भात कारवाई न करता ठेकेदाराला मुदत वाढवून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

या प्रकल्पासाठी अरिहंत कन्स्ट्रक्शन, पुणे व शलाका इन्फ्रा प्रा. लि. हे भागीदारीमध्ये कंत्राटदार म्हणून काम करत होते व त्यांना दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे तथापि, त्यांनी बॅक गॅरंटी स्वरुपात दिलेली सुरक्षा अनामत बनावट असल्याचे दिनांक १७ जून, २०२२ रोजी आढळून आलेले आहे. दरम्यान त्यांना रुपये ३.०९ कोटीची देयके अदा करण्यात आली होती.
(३), (४) व (५) सदर प्रकल्प सन २०१९ च्या दरसुचीनुसार मंजूर केला होता व उक्त बाब निदर्शनास आली तेंव्हा सन २०२२ च्या दरसुचीनुसार मुळ प्रकल्प किंमतीत २५.९४ टक्के वाढ होत होती. त्याचप्रमाणे, शहरास ६-७ दिवसा आड पाणी पुरवठा होत असल्याने सदर योजना देखील लवकर कार्यान्वित होणे शहरासाठी आवश्यक होते. शलाका इन्फ्रा प्रा. लि. यांनी बनावट बॅक गॅरंटी दिल्याची जबाबदारी स्विकारुन भागीदारीतून बाहेर पडल्यामुळे अरिहंत कन्स्ट्रक्शन, पुणे यांना उर्वरीत काम करुन घेण्याबाबत वरणगांव नगरपरिषदेचा ठराव मंजूर करुन नवीन बॅक गॅरंटी घेऊन प्रकल्पाचे काम पुर्ण करुन घेण्याकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील मालाड (पश्चिम) लिंक रोड येथे मोकळया भूखंडावर अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत**

**(४) * ६९९३२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील महानगरपालिकेच्या पी/उत्तर हद्दीतील मालाड (पश्चिम) लिंक रोड वळणई मेट्रो रेल्वे स्थानकाजवळील असलेल्या मॉरीस गॅरेज या खासगी जागा मालकाने मोकळ्या भूखंडावर अनधिकृतरित्या १५ ते २० हजार चौ.फुट बांधकाम केले असून संबंधितांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिनांक २० जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मालाड (पश्चिम) लिंक रोड येथील हॉटेल आहुराच्या मालकानी हॉटेलच्या इमारतीमध्ये बेकायदेशीरपणे फेरबदल केले असून त्यास संबंधित अधिकारी यांनी सहकार्य करुन महानगरपालिकेचा व शासनाचा महसूल बुडविला असल्याचे निदर्शनास येऊनही अद्यापपर्यंत संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,
(३) तसेच मालाड (पश्चिम) रामचंद्र लेन येथील बिकाजी फुड्स इंटरनॅशनल लि. या इमारतीचा व व्यावसायिकाच्या अनधिकृत बांधकामाप्रकरणी महापालिकेचे अधिकारी कोणतीही कारवाई करित नसल्याने शासनाचा महसूल

बुडविला जात आहे तसेच सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम करणारे कामगार जीव मुठीत घेऊन व कोणत्याही संरक्षणाच्या संसाधनाशिवाय काम करत असल्याचे निदर्शनास येऊनही संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी अनधिकृत बांधकाम विरोधात कारवाई करण्यासंदर्भांत मा.मुख्यमंत्री व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर जागा ही गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करण्यात आलेली आहे.

सदर जागेवर खाजगी जागा मालकाने केलेल्या अनधिकृत बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २९.०३.२०२२ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावून दिनांक २०.०७.२०२२ रोजी निष्कासनाची कारवाई बजावण्यात आली. तथापि सदर बांधकामावर निष्कासनाची कारवाई सुरु असतांना जागा मालकाने मा. मुंबई शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याबाबत सादर केलेल्या कागदपत्रांस अनुसरुन दिनांक २०.०८.२०२२ रोजी नवीन अंतिम आदेश पारित करण्यात आले.

मा. मुंबई शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे जागा मालकाने दाखल केलेला दावा मा. न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर, सदर प्रकरणी जागा मालकाने दिनांक १९.०७.२०२३ रोजी मा. उच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्रमांक १३४८१/२०२३ दाखल केला असून, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दोन आठवड्यांच्या कालावधीत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले आहे. तसेच सदर प्रकरणी मा. न्यायालयाने अंतरिम स्थगिती आदेश दिले आहेत.

तसेच सदर प्रकरणी कारवाई करण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविण्यात आले आहे.

(२) मालाड (प), लिंक रोड येथील हॉटेल आहुरामध्ये बेकायदेशीरपणे फेरबदल केल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अंतर्गत व कलम ५५ अन्वये नोटीसा बजावून सदरचे बांधकाम अनुक्रमे दिनांक ०२.०५.२०२३ व दिनांक २१.०६.२०२३ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

(३) मालाड (प), रामचंद्र लेन येथील असलेल्या बिकाजी फुडस इंटरनॅशनल लि. या खाजगी इमारतीस मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५३ (बी) अन्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल सादर करण्याकरिता नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर सदर संस्था मालकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केलेल्या परिक्षण अहवालानुसार सदर इमारतीची दुरूस्ती करण्याकरिता दिनांक १५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

सदर संरचनात्मक दुरूस्तीचे काम करून घेण्याची जबाबदारी ही संबंधित कंत्राटदार व त्या गृहनिर्माण संस्थेची असल्याने त्यांना संरक्षण उपाययोजना करुन घेण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थळपाहणी करण्यात आली असता तेथे सुरक्षेच्या उपाययोजना केल्या असल्याच्या आढळून आल्या आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेत करमुल्यांकन विभागात झालेला गैरव्यवहार

**(५) * ७०३८९ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेतील करमुल्यांकन विभागात ६० ते ७० मालमत्ता आहेत त्याचा मालमत्ता कर कमी दर्शवून वसुलीकामी करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रभाग समितीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या कराच्या नस्ती देखील संगणकातून गहाळ झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहारात संबंधित अधिकारी/कर्मचारी सहभागी असून या प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत तात्काळ चौकशी करणे आवश्यक असून यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले असून सदरचे निवेदन नियमोचित कार्यवाहीसाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना पाठविण्यात आले आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या सर्व मिळकतीच्या नोंदी अद्यावत असून कोणतीही मिळकत गहाळ झालेली नाही.

तसेच, मा.श्री.रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांना दिनांक २२.०६.२०२३ रोजी सादर केलेले पत्र भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस प्राप्त झाले असल्याचे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील सांडपाणी शुध्दीकरण व पुनर्वापर प्रकल्प राबविताना झालेला गैरव्यवहार

**(६) * ६४९६६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील समाज कल्याण कार्यालयांतर्गत येणाऱ्या ४ निवासी शाळा व ९ शासकीय वसतिगृहांमध्ये सांडपाणी शुद्धीकरण आणि पुनर्वापर प्रकल्प राबवताना समाज कल्याण, सहाय्यक आयुक्त यांनी ०२ कोटी ८२ लाख ६५ हजार रुपये खर्चाच्या आखलेल्या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प खाजगी कंपन्या तीन ते सहा लाखांना पूर्ण करुन देत असताना प्रत्येक प्रकल्पासाठी २५ लाख रुपयांचे टेंडर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांचेमार्फत काढण्यात येवून त्याकरिता ३ कोटी रुपयांच्या मागणीस जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय कामांसाठी जेम पोर्टलवर निविदा न मागविता महा ई-टेंडर पोर्टलद्वारे निविदा मागवून लाईफ फर्स्ट कन्सेप्ट अँड टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस काम देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गैरव्यवहाराबाबत अनेक सामाजिक संघटनांनी दिनांक ८ एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, पुणे यांच्या दिनांक २६.३.२०२२ च्या आदेशान्वये जिल्हा वार्षिक योजना अनुसूचित जाती घटक कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत नावीन्यपूर्ण योजनेमधून ४ शासकीय निवासी शाळा व ९ शासकीय वसतिगृहांसाठी सांडपाणी शुध्दीकरण व पुनर्वापर प्रकल्पासाठी रूपये २,८२,६५,३३६/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, पुणे यांनी सदर कामास तांत्रिक मान्यता दिलेली आहे.
(३) सदर प्रकल्प हा केवळ वस्तु खरेदीचा नसून यामध्ये सिव्हील वर्क आणि इतर जोडणी प्रक्रियेचा समावेश असल्याने महा ई- टेंडरवर ई-निविदा प्रक्रिया राबवून निविदेतील एल-१ निविदाधारकास काम देण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यतेनुसार एकूण रक्कमेच्या १ टक्के रक्कम त्रयस्थ पक्षकाराकडून अंकेक्षण (Third Party Audit) करण्यासाठी राखीव असून योजनेचे मुल्यमापन प्राध्यापक तथा समन्वयक, गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे यांच्याकडून करण्यात येत आहे.
(४) नाही.
(५) त्रयस्थ पक्षकाराकडून परिक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यांनतर सदर प्रकरणी काही अनियमितता आढळून आल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यात साठवण बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(७) * ६८९६२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोहोगाव जवळील पाचगाव (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथील मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून भलभनी नाल्यावर ६० लाख रुपयांचा निधी खर्च करुन बांधलेल्या गेटेड साठवण बंधाऱ्याचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने भविष्यात हा बंधारा शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी उपयोगी ठरणार नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त साठवण बंधारा तसेच तोहोगाव, पाचगाव, वामनपल्ली, चिंवडा, बेरडी यासह अनेक ठिकाणी गेटेड साठवण बंधाऱ्याचे काम एकाच कंत्राटदाराला देण्यात आले असून या कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन बांधकाम केल्यामुळे या बंधाऱ्यास धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांची गुणनियंत्रक मंडळाकडून तपासणी व उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून तपासणी न करता विभागाने करोडो रुपयांची देयके मंजूर केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधाऱ्यांची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही. सदर बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध होईल.
(२) सदर बंधारे बांधकामाचे कंत्राट एकाच कंत्राटदाराला मिळाले असून कंत्राटदाराने बांधकामासाठी वापरलेले साहित्य शासकीय संस्थेमार्फत साहित्य तपासणी करूनच वापरण्यात आलेले आहे व सदर बंधाऱ्यास कोणत्याही प्रकारचा धोका निदर्शनास आलेला नाही.
(३) सदर कामाची गुणनियंत्रण तपासणीकरिता या विभागमार्फत प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणवत्ता नियंत्रक पथक यांना दिनांक १०/०७/२०२३ अन्वये कळविण्यात आलेले आहे व सदर कामाचे गुणनियंत्रण तपासणी झाल्यावरच अंतिम देयके देण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंधळपाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय विभाग कार्यालयाचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(८) * ६५१६२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंधळपाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे विभागाने जवळजवळ ३ कोटी रुपये खर्च करून उभारलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे चार वर्षातच स्लॅब कोसळून भिंतींना तडे गेल्यामुळे सदर कार्यालय भाडयाच्या वास्तूत स्थलांतरीत करावे लागले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीच्या दुरुस्तीचे बांधकाम प्रलंबित राहिल्याने दोन वेळा कार्यालय भाड्याच्या वास्तूत स्थलांतरीत करण्यात आल्याने भाड्यापोटी लाखो रुपये खर्च होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निकृष्ट बांधकाम, इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण तातडीने कार्यवाही करणेबाबत तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रायगड या इमारतीच्या बांधकामाकरीता जबाबदार असणारे अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, उप अभियंता तसेच बांधकामाचे ठेकेदार इत्यादींवर प्रशासकीय कारवाई व फौजदारी गुन्हा दाखल करून संबंधित ठेकेदारास काळया यादीत टाकण्याबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना क्षेत्रीय स्तरावरून कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धामापूर (ता. मालवण, जि.सिंधुदूर्ग) गावातील शेतजमिनींचे खाऱ्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी पोई कालव्यावर बंधारा बांधण्याबाबत

**(९) * ६५१०९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामापूर (ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेत जमीनीमध्ये कर्ली खाडीचे खारे पाणी भरतीच्या वेळी शेतात शिरुन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाऱ्या पाण्यापासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी गावातून वाहणाऱ्या पोईकालवा बंधाऱ्यावर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन कायमस्वरुपी उघडझाप करणारी झडपे असलेला सिमेंटचा पक्का बंधारा बांधून देण्यासाठी मा.केंद्रीय सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग मंत्री महोदयांनी तसेच या भागातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग तसेच उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, मालवण यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रत्यक्ष भेटून अर्ज/निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामासाठी शासनाने आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन दिला आहे, त्यापैकी किती निधी आतापर्यंत खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सिमेंट बंधाऱ्यांचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

मा.केंद्रीय सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग मंत्री महोदयांनी तसेच, नागरीकांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद सिंधुदूर्ग तसेच उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, मालवण यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रत्यक्ष भेटून दिलेले अर्ज/ निवेदने या विभागास अप्राप्त आहेत.

तथापि, ग्रामस्थ श्री.प्रशांत गंगाराम गावडे यांनी कार्यकारी अभियंता, सिंधुदुर्ग खारभूमी विकास विभाग, सिंधुदुर्ग यांना दिनांक १४/११/२०२२ रोजी अर्ज केला आहे.

(३) सदर बंधारा खारभूमी विभागाच्या बृहत आराखड्यामध्ये नसल्याने निधी उपलब्धतेबाबत कुठलीही कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

(४) सदर योजना खारभूमी विभागाच्या बृहत आराखड्यात समाविष्ट नाही. तसेच अस्तित्वातील व भविष्यकालीन योजनांमध्ये देखील सदर योजनेचा समावेश नाही. सदर बंधारा जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या मार्फत बांधण्यात आलेला असून त्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत तसेच त्याबाबत योग्य कार्यवाहीस्तव ग्राम विकास विभागास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ ( जि. जळगाव ) येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अखत्यारीतील भूखंडावर झालेले अतिक्रमण

**(१०) * ६९७५२ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) येथील एस.टी.महामंडळाच्या अखत्यारीतील नियोजित बसस्थानकासाठी आरक्षित भूखंड क्र.१२१ व १२१-अ वर बेकायदेशीररित्या अतिक्रमण करुन सुमारे १०० टपऱ्या उभारण्यात आल्या असून तेथे सर्रासपणे शैक्षणिक साहित्य, तंबाखू, गुटखा व अंमली पदार्थांची अवैध विक्री करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच एस.टी.महामंडळाच्या भूखंडा लगतच्या हायवे सर्व्हे क्र.१२ ते विकास हौसिंग सोसायटी, जामनेर रोडपर्यंत देखील मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीररित्या अनधिकृत दुकानेही उभारलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर टपऱ्यांना वीज वितरण कंपनी व स्थानिक प्रशासनामार्फत बेकायदेशीररित्या मुलभूत सुविधा पुरविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर टपरीधारकांकडून गुंडांमार्फत दरमहा खंडणी वसूल करणे, लगत असलेल्या भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहटा कॉलेजमधील विद्यार्थीनी, त्या परिसरात ये-जा करणाऱ्या महिला वर्गांची छेडछाड होण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू अनधिकृत टपऱ्या/दुकानां विरोधात राजकीय दबावापोटी नगरपरिषदेकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत टपऱ्या व दुकाने निष्कासित करणे तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) भुसावळ (जि.जळगांव) येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या व नियोजित बसस्थानकासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या सर्व्हेक्र. १२१ व सर्व्हेक्र.१२१-अ या भुखंडाच्या हद्दीत नियोजित बसस्थानक प्रस्तावित आहे. या भूखंडाच्या हद्दीत कोणतेही अतिक्रमण नाही.
(२) सदर रा.प.महामंडळाच्या भुखंडाच्या हद्दीमध्ये कोणतेही अनाधिकृत टपऱ्या वा दुकाने नाहीत.
(३) ,(४), (५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील गणेशपेठ बसस्थानकावरील फलाटांचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत

**(११)** * **६४७९७ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गणेशपेठ बसस्थानकावर प्रतिदिन सुमारे २३०० पेक्षा जास्त बस ये-जा करीत असून हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या बसस्थानकावरील फलाटांचे काम संबंधित ठेकेदाराने अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत ठेवल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बसस्थानकावरील ३६ फलाटांच्या बांधकामासाठी संबंधित ठेकेदारास आजमितीपर्यंत रुपये ११ कोटींची रक्कम अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बसस्थानकावरील फलाटांचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच संबंधित ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) आजमितीपर्यंत ठेकेदारास रुपये ४,३६,११,१९८/- अदा करण्यात आले आहे.

(३) व (४) गणेशपेठ बसस्थानकाच्या बांधकामास त्वरीत सुरुवात करुन काम पूर्ण करणेबाबत कंत्राटदारास वारंवार पत्रव्यवहार व भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार कंत्राटदाराने गणेशपेठ बसस्थानक येथील बांधकाम सुरु करीत असल्याचे लेखी आश्वासन दिले असून सध्या काम चालू केलेले आहे.

-----------------

**राज्यातील विशेषत: पुणे मेट्रोसाठी सिव्हिल इंजिनिअर या पदासाठी झालेल्या मुलाखतीबाबत**

**(१२) * ६७५४८ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: पुणे मेट्रोसाठी “सिव्हिल इंजिनिअर” या पदासाठीच्या भरतीसाठी बिहार मधील पाटण्यात मुलाखत घेण्यात आली असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टाटा प्रोजेक्ट कंपनीकडून पुणे मेट्रोची उभारणी करण्यात येत असताना प्रोजेक्टमधील मेट्रो लाईन तीनसाठी सिव्हिल इंजिनिअर पदाची भरती जाहीर करण्यात आल्यानंतर भरतीची संपूर्ण प्रक्रिया बिहारमध्ये राबविण्यात आल्याने राज्यातील पदवीधरांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात स्थानिक नागरिकांना ८० टक्के रोजगार देण्याचा कायदा असतानाही पुणे मेट्रोसाठी ही नोकर भरती करताना या कायद्याचे उल्लंघन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्रात या भरतीची कोणतीही जाहिरात न देता परराज्यात भरतीची जाहिरात दिल्यामुळे मराठी मुलांच्या रोजगाराची संधी डावलण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होण्यासंदर्भात तसेच यात जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४), (५) व (६) पुणे येथे हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन ३ प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने मेट्रो सवलत करार कंपनी पुणे आय टी सिटी मेट्रा रेल लि. या खाजगी विकासामार्फत सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर संकल्पना करार, बांधा, अर्थपुरावठा करार, चालवा आणि हस्तांतरण करा (DBFOT) मॉडेल अंतर्गत हाती घेण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य कामे करण्यासाठी सवलत कारार कंपनीमार्फत ईपीसी कंत्राटदार म्हणून मे.टाटा प्रोजेक्टस लि. यांची नियुक्ती केलेली आहे. मेट्रो प्रकल्पाचे काम योग्य दर्जा राखून विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने सदर कंत्राटदार कंपनीमार्फत मेट्रो प्रकल्पावर काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची (तांत्रिक, अतांत्रिक व कुशल) भरती करण्याकरीता ऑनलाईन (Online) पध्दतीने सोशल मिडीया (Social Media) वर कंत्राटदार कंपनीमार्फत जाहिरात प्रसारित करण्यात येतात. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन कंत्राटदार कंपनीमार्फत मुलाखतीद्वारे आवश्यक मनुष्यबळाची भरती करण्यात येते.

-----------------

**राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्याबाबत**

**(१३) * ६४६८७ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू),**

**श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्याची आणि काजू फळ विकास योजना राबवण्याची घोषणा राज्य शासनाने सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केली असून, अद्यापपर्यंत या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा फळपिकासाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करावे, काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करावीत व गोवा राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांकरिता राबविण्यात येत असलेल्या किमान हमी भाव योजनेच्या धर्तीवर राज्यातही काजूला किमान हमी भाव लागू करावा, अशा मागण्या तत्कालीन विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी त्यांच्या दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील काजू उत्पादक शेतकरी संकटात सापडला असून त्यांच्या उत्पादनाला तुटपुंजा भाव मिळत असल्याने तसेच परदेशातून आयात होणाऱ्या काजूवर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नसल्यामुळे राज्यातील विशेषतः कोकणातील काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या काजूला चांगला भाव मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच चंदगड, आजरा, भुदरगड इत्यादी ठिकाणी काजू बियांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असून तेथे काजू बोर्डाचे मुख्यालय असण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन काजू उत्पादक शेतकऱ्यांकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

वित्त मंत्री यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पिय भाषणामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १६.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील काजू फळ पिकाच्या विकासाकरिता "महाराष्ट्र राज्य काजू मंडळ" स्थापन करण्यात आले असून, त्याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तत्कालीन विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी त्यांच्या दिनांक २७.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास मागण्या केलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, काजूचा उत्पादन खर्च रु.८६.१४/- प्रति किलो इतका आहे. तर रत्नागिरी कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये काजूला माहे मार्च ते जून या कालावधीत सन २०२२ मध्ये रु.१३०/- व सन २०२३ मध्ये रु.११७/- प्रति किलो इतका सरासरी दर प्राप्त झालेला आहे.

तसेच परदेशातून आयात होणाऱ्या काजू बी वर २.५ टक्के आयात शुल्क आकारले जाते.
(४) कोल्हापूर जिल्ह्यात चंदगड येथे काजू बोर्डाचे विभागीय कार्यालय स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.
(५) काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. आंबा बोर्ड स्थापनेबाबतचा प्रस्ताव पणन मंडळाकडून मागविण्यात आला आहे. तसेच काजूला हमी भाव देणे हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील असून, तत्कालीन विरोधी पक्षनेते यांच्या मागणीच्या अनुषंगाने केंद्र शासनास दिनांक १२.०७.२०२३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्याच्या रसायनमिश्रित पाण्यामुळे मळद तलावातील पाणी प्रदुषित होत असल्याबाबत

**(१४) * ७०१५४ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरकुंभ (ता.दौंड,जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यामधून रसायनमिश्रित पाणी कोणतीही आवश्यक प्रक्रिया न करता मळद तलावात सोडत असल्याने प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगांची पाहणी करुन यात दोषी आढळून आलेल्या ०३ उद्योगांना उत्पादन बंदीचे आदेश, १४ उद्योगांना प्रस्तावित आदेश व एका उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) कुरकुंभ औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांमधून होणाऱ्या प्रदूषणाबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये मे, २०२१ मध्ये प्रसिद्ध बातमी व त्यानुषंगाने जुलै, २०२१ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त ०३ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश, १८ उद्योगांना प्रस्तावित आदेश व ०२ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिका (जि.पालघर) प्रभाग समिती "सी" मधील करपट्टी विभागात झालेला गैरव्यवहार

**(१५) * ६५०२६ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "सी" मधील करपट्टी विभागातील कर अधिकारी यांनी महानगरपालिकेकडे जमा झालेल्या ७२ लाख ६८ हजार ८९९ रुपये इतक्या करपट्टीच्या रकमेचा गैरव्यवहार केल्याची पुराव्यासह लेखी तक्रार श्री.चरणभट यांनी आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशी अहवालानुसार आयुक्तांनी कर अधिक्षक यांना तात्काळ निलंबित केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कर अधिकारी, श्री.जानी हे आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी दोषी आढळून येऊनही आयुक्तांनी त्यांचे विरोधात गुन्हा दाखल न करण्याची तसेच सहाय्यक आयुक्त यांनी सदर गैरव्यवहाराकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले असूनही त्यांची चौकशी न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची तक्रार वसई-विरार शहर महानगरपालिका स्तरावर प्राप्त झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेल्या तपासणी अंती श्री.अरुण जानी, कर अधिक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे.
तसेच यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या चौकशी पथकाच्या अहवालानुसार श्री.गणेश पाटील, प्रभारी सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती "सी" चंदनसार यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) सदर प्रकरणी श्री.अरुण जानी, कर अधिक्षक यांना निलंबित केले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा किंवा कसे याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथील शौचालयाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(१६)** * **६९५७७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथे ८०० चौरस मिटर शौचालयासाठी नगरपंचायतीने सुमारे ८६ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजूरी दिली असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घर बांधणीसाठी सद्यःस्थितीत २००० रुपये प्रतिचौरस मिटर असा दर अस्तित्वात असतांना नगरपंचायतीने शौचालय बांधणीसाठी १० हजार ७५० रुपये प्रतिचौरस मिटर असा दर दिल्याने सदर शौचालय बांधकामात मोठा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच गत ५ वर्षात नगरपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सर्वच कामात गैरव्यवहार झाल्याची तक्रार करत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे चौकशीची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ च्या मंजूर दरसूचीनुसार शौचालयासाठी करण्यात येत असलेले बांधकाम अंदाजे ११५० स्क्वे.फुट असून सेप्टीक टँक सुमारे २६० स्क्वे.फुट आहे. शौचालयाच्या

अंदाजपत्रकातील कामाची मूळ रक्कम रुपये ६२.७२ लक्ष असून सदरचे बांधकाम अंदाजे ११५० स्क्वे.फुट असल्याने बांधकामाचा दर प्रती स्क्वे.फुट अंदाजे रक्कम रुपये ५५००/- याप्रमाणे होणार आहे. सर्वसाधारण बाजारभावाप्रमाणे इमारत बांधकामाचा दर हा अंदाजित रक्कम रुपये २०००/- ते २५००/- प्रती स्क्वे.फुट असतो. परंतु सदर इमारत अद्ययावत स्वरुपात बांधण्यात येणार असल्याने प्रती स्क्वे.फुटचा दर वाढला आहे.
(३) व (४) यासंदर्भात जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार प्राप्त झाली नाही. तथापि, उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे शौचालय इमारत बांधकाम प्रकरणी तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, कणकवली यांनी मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांचेकडून अहवाल मागविला होता. मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांनी उपविभागीय अधिकारी, कणकवली यांना अहवाल सादर केला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळेगाव दाभाडे (ता.मावळ, जि.पुणे) येथील इंद्रायणी विद्यामंदिर महाविद्यालयाच्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(१७)** * ७००८७ **श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव दाभाडे (ता.मावळ, जि.पुणे) येथील इंद्रायणी विद्या मंदिर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने महाविद्यालय इमारतीच्या सुधारित बांधकामासाठी परवानगी मिळण्याकरीता नगरपरिषदेकडे प्रस्ताव सादर केला परंतु सदर प्रस्तावात त्रुटी असल्याने नगरपरिषद प्रशासनाने बांधकाम परवानगी नाकारली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बांधकामाची परवानगी नसतानाही महाविद्यालय व्यवस्थापनाकडून सदर बांधकाम अवैधरित्या सुरू असल्याने सदर बांधकाम स्थगित करण्यात यावे अशा स्वरूपाच्या तक्रारी स्थानिकांकडून नगरपरिषद प्रशासन तसेच शासनाकडे करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांनी शासनाकडे दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी पाठविलेला वस्तुस्थितीदर्शक अहवाल कार्यवाहीस्तव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामास स्थगिती देणे तसेच संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावातील त्रुटींच्या अनुषंगाने नगर परिषद तळेगाव दाभाडे यांनी दिनांक ३१/०५/२०२२ च्या पत्रान्वये अर्जदार संस्थेस त्रुटी कळवून अर्ज नामंजूर करुन निकाली काढला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
तळेगाव दाभाडे, नगरपरिषद प्रशानसनाकडे स्थानिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(३) प्रस्तुत अहवालाच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक १९/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांना कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) नगरपरिषद तळेगाव दाभाडे यांच्या दिनांक २४/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर बांधकाम थांबविण्याबाबत संस्थेस कळविले आहे. संस्थेने दिनांक ०३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम थांबवत असल्याबाबत नगरपरिषदेस कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिका अंतर्गत कचरा संकलन करणाऱ्या ए.जी.एन्वहायरो कंपनीने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१८) * ७०७८० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेअंतर्गत कचरा संकलनाचे काम करणाऱ्या ए.जी.एन्वहायरो कंपनीने मनपा ५ झोन अंतर्गत प्रतिदिन २५० ते ३०० मे.टन कचरा संकलीत होत असताना तेवढीच माती मिसळवून डम्पींगमध्ये दररोज ५०० ते ६०० मे. टन कचरा संकलीत केल्याची नोंद करुन नागपूर महानगरपालिकेकडून कोटयवधी रुपये वसूल करुन गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कंपनीच्या सुपरवायझरकडून कामगारांवर दडपशाही करुन जीवे मारण्याची धमकी देत असल्याच्याही तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये दिनांक २८.०६.२०२० रोजी मे. ए.जी.इन्वहायरो कंपनीचे वाहनात माती मिसळीत कचरा वाहतूक केल्याची बाब आढळून आली.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्याव्दारे करण्यात आलेल्या चौकशी अहवालानुसार यासंदर्भात मे.ए.जी.इनव्हायरो कंपनीकडून रुपये २७,११,१०३/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर केलेले अनुदान देण्याबाबत

**(१९) * ६४६६९ श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण),**

**श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊनही कांद्याच्या दरामध्ये घसरण झाल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०२३ अखेरीस कांदा विक्री केलेल्या अनेक शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेले अनुदान अद्यापही मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांदा अनुदान मागणीच्या अर्जासोबत कांदा पिकाची नोंद असलेला संगणकीय सात-बारा जोडणे, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विकल्याची पावती जोडणे तसेच तांत्रिक त्रुटी इ. अटींमुळे पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कांदा उत्पादकांना तातडीने दिलासा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) राज्यामध्ये माहे जानेवारी, २०२३, फेब्रुवारी, २०२३ व मार्च, २०२३ या कालावधीमध्ये लेट खरीप कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्याने कांद्याच्या दरामध्ये घसरण झालेली होती.

(२) शासन निर्णय, दिनांक २७/३/२०२३ अन्वये राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये, खाजगी बाजार समित्यामध्ये, थेट पणन अनुज्ञप्तीधारकांकडे अथवा नाफेडकडे दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. कांदा अनुदान वितरित करण्यासाठी रुपये ५५०००.०० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. सदर निधी उपलब्ध झाल्यावर तातडीने अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(३) व (४) ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर ई-पीकपेऱ्यांची नोंद झालेली नाही, अशा ठिकाणी कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्राची शहानिशा करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी गावपातळीवर संबंधित गावाचे तलाठी, कृषि सहाय्यक व ग्रामसेवक यांची समिती गठित करावी. सदर समितीने शेतकऱ्यांच्या कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्राची पाहणी करून, शंका असल्यास आजूबाजूच्या लोकांशी चर्चा करून सत्यता पडताळून, शहानिशा करावी व ७/१२ उताऱ्यावरील नोंदीसमोर स्पष्टपणे नमूद करावे. असे प्रमाणित केलेले ७/१२ उतारे कांदा अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येतील. सदर समितीने आपला अहवाल ७ दिवसांत संबंधित बाजार समितीकडे सादर करावा, अशा सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २१ एप्रिल २०२३ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत.

शासन पत्र दिनांक २९ मे २०२३ व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक २९.०५.२०२३ नुसार ७/१२ उता-यावर खरीप / रब्बी अशी नोंद असली तरी दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीतील कांदा खरेदी ग्राहय धरण्यात यावी तसेच लेट खरीप कांद्याला जरी अनुदानाची घोषणा झाली

असली तरी " लाल कांदा" अशी नोंद खरेदी पट्टीमध्ये नसल्यामुळे शासन निर्णयातील लाल कांदाच्या शर्तीवर आग्रह धरु नये अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वर्तकनगर (ठाणे शहर) येथील बेकायदेशीर साई सम्राट रेसिडेन्सी लॉजिंग व बोर्डिंगवर कारवाई करण्याबाबत**

**(२०) * ६७५५८ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत टिकुजीनी वाडी, मानपाडा येथे अनधिकृतपणे बांधण्यात आलेले साई सम्राट रेसिडेन्सी नावाचे बेकायदेशीर लॉजिंग व बोर्डिंगमध्ये अनैतिक धंदे सुरु असल्याची बाब लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, महानगरपालिका यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक रहिवाशांना त्रास होत असल्याने लॉजिग व बोर्डिंगवर बंदी घालण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सदरचे निवेदन ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर लॉजिंग व बोर्डिंगवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली असून दिनांक ०३.०७.२०२३ रोजी सदर साई सम्राट रेसिडेन्सी लॉजिंग व बोर्डिंग सील करण्यात आली असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**डोंबिवली (जि.ठाणे) मानपाडा रोडवरील मौजे गजबंधन पाथर्ली येथील बेकायदेशीर बांधकामाबाबत**

**(२१) * ६५०३२ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील मानपाडा रोडवरील मौजे गजबंधन पाथर्ली येथील आरक्षण क्र.९३ (बगीचा) मध्ये गावदेवी मंदिराच्या बाजूला एका ७ मजली अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरु असल्याची लेखी तक्रार वास्तुविशारद श्री.संदीप पाटील यांनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गत सत्रात बेकायदेशीर बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी मुद्दा उपस्थिती करूनही अद्यापही महानगरपालिका प्रशासनाकडून आलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आलेली नाही, हे हे खरे आहे काय,
(३) तसेच डोंबिवली (पूर्व) येथील आयरे गाव हद्दीतील ब्रिटीश काळापासूनच्या तलावात भूमाफियांनी भराव टाकून ५० बेकायदा चाळी उभारल्या असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्या प्रभाग व वॉर्डमध्ये होत असलेल्या बेकायदेशीर बांधकामांविरोधात संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन बेकायदेशीर बांधकाम प्रकरणातील भूमाफिया तसेच प्रशासनातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ६ (फ) यांनी अनधिकृत बांधकामांबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, दिनांक १०.०५.२०२३ रोजी सदर इमारतीचे सर्व मजल्याचे आर.सी.सी. स्लॅब व भिंतीचे बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली.

तथापि, बांधकामधारकाने पुन्हा बांधकाम सुरू केल्याचे दिसून येत असल्याने, सदर इमारत पूर्णपणे निष्कासित करणेबाबत कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

सदर अनधिकृत बांधकामाबाबतच्या तक्रारीची दखल महानगरपालिकेने घेतली नाही, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.
(३) अशा आशयाची बातमी दै. लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०६.०४.२०२३ रोजी प्रसिध्द झाली होती.

त्याअनुषंगाने सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ८ (ग) यांनी पडताळणी केली असता, बातमीमध्ये नमूद केल्यानुसार सदर तलाव महसुली गावनकाशामध्ये नसल्याने, सदर तलाव ब्रिटीशकालीन असल्याचे दिसून येत नाही.

सदर तलावाचे सुशोभिकरण महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. तलावाच्या पूर्व व पश्चिमेकडील बाजूस निवासी चाळ स्वरूपाची ४ बांधकामे असून, सदर बांधकामे अंदाजे ५-६ वर्षापूर्वीची असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) सदर चाळीच्या अधिकृततेबाबतची तपासणी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर प्रस्तावित आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.